# पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड

**PUNE MAHANAGAR PARIVAHAN MAHAMANDAL LIMITED**

शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे ४११ ०३७

Shankarshet Road, Swargate, Pune 411 037.

CIN No-U60210PN2007PLC130461 Website-www.pmpml.org

☎ :24440417

☎ :24440417

फॅक्स :२४४४५४९०

Fax :24445490

E-mail –


जावक क्र. पी.एम.पी.एम.एल./स्थावि/ दिनांक : १६/१२/२०२४

**Ref.No. P.M.P.M.L/ CIVIL ENGG /**

## कोटेशन नोटीस

परिवहन महामंडळाच्या खालील तातडीच्या कामांसाठी दरपत्रके मागविण्यांत येत आहेत. सदर कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | पूर्वगणित रक्कम (रूपये) |
|---|---|---|
| १ | परिवहन महामंडळाच्या अप्पर डेपोची तपासणी करून औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास देणेसाठी स्थैयता प्रमाणपत्र सादर करणे. | बी-२ पध्दतीने दर सादर करावयाचे आहेत. |

सदर कामासाठी मनपाचे पॅनेलवरील अथवा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या नियमाप्रमाणे कामाची माहिती असणारे अधिकृत अथवा अशा स्वरूपाचे काम करणारे आर्किटेक्ट/स्ट्रक्चरल आर.सी.सी.डिझाईनर यांचेकडून दरपत्रके मागविण्यांत येत आहे. इच्छूक संस्थांनी दिनांक १६/१२/२०२४ ते दिनांक १८/१२/२०२४ या मुदतीत महामंडळाकडे दिनांक १८/१२/२०२४ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यत सिलबंद दरपत्रक मुख्य बारनिशी विभागाकडे सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत. दरपत्रकासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावीत.

## कामाबाबतच्या अटी-शर्ती.

(१) दरपत्रकासोबत संस्था नोदणीकृत दाखला,पॅनकार्ड इ.च्या छायांकित प्रती जोडण्यांत याव्यात.

(२) प्रोफेशनल फी बी-२ पध्दतीप्रमाणे देण्यांत यावे.

(३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे नियमानुसार डेपो बांधकामाचे/स्ट्रक्चरल शेड, वर्कशॉप सेक्शन इ.ची तज्ञ अभियंत्याकडून पाहणी करणे. डेपोमधील सर्व स्ट्रक्चरची पाहणी करून मोजमापे घेणे व विविध नमुन्यात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या नियमानुसार नकाशे तयार करून ट्रेसिंगसह ०४ प्रति महामंडळास सादर करणे. (मान्य ड्रॉईगची सीडी महामंडळास देणे)

(४) डेपो बांधकामाचे/स्ट्रक्चरल शेड्वी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तपासण्या व चाचणी घेऊन विहित नमुन्यात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास सादर करणेसाठी स्थैयता प्रमाणपत्र परिवहन महामंडळास सादर करणे.

(५) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे ऑनलाईन फॅार्म,डि.डि.भरणे,सर्व कागदपत्रे सादर करणे व पाठपुरावा करून महामंडळाचे नांवे फॅक्टरी लायसेन्स महामंडळाकडे सादर करणे.

(६) महामंडळाकडे फॅक्टरी लायसेन्स प्राप्त झाल्यानंतरच बिल अदा करणेत येईल.

(७) इच्छूक संस्था/व्यक्ति यांनी त्यांचे अधिकृत लेटर हेडवर तपशीलासह सिलबंद पाकिटात त्यांचा प्रस्ताव वर दिलेल्या मुदतीत महामंडळाच्या बारनिशी विभागाकडे सादर करावयाचा आहे.

(८) देय बिलातून आयकर,जीएसटी वसूल करणेत येईल.

कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार महामंडळाने राखून ठेवलेले असून त्याची कारणे देण्याचे बंधन महामंडळावर राहणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

चिफ इंजिनिअर (सिव्हिल)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड